-: प्रेसनोट दिनांक - २८/०४/२०२६ :-

आरोपी लोकसेवक ०१) सुभाष आनंदा चौगले, वय - ३९ वर्षे, पद - पोलीस हेड कॉन्स्टेबल,ब.नं.२०५२, नेमणुक - भुदरगड पोलीस ठाणे, रा. गुडाळ, ता. राधानगरी, जि.कोल्हापूर, ०२) मुस्तफा दस्तगीर शेख, वय - ४१ वर्षे, (खाजगी इसम), रा. साई कॉलनी, गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर यांनी लाच मागणी करुन स्विकारलेबाबत.......

---

तक्रारदार यांचेवर भुदरगड पोलीस ठाणे येथे अपघाताचा गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास भुदरगड पोलीस ठाणेकडील पोलीस हेड कॉन्स्टेबल सुभाष चौगुले यांच्याकडे आहे. सदर गुन्हयाचे तपासात पोलीस चौगुले यांनी मुळ तक्रारदार यांना बोलावुन घेवुन गुन्हयात चार्जसीट व्यवस्थित पाठवतो, गुन्हयात ताब्यात घेतलेली स्वीप्ट कार सोडुन देतो, गुन्हयात मदत करतो त्याकरीता १,००,०००/- रूपये दयावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांच्याकडे १,००,०००/- रूपये लाचेची मागणी केली. म्हणुन तक्रारदार यांनी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये तक्रारदार यांचेविरूध्द भुदरगड पोलीस ठाणे येथे दाखल असले गुन्हयात मदत करतो, गुन्हयात चार्जसीट व्यवस्थित पाठवतो, गुन्हयात ताब्यात घेतलेली स्वीप्ट कार सोडुन देतो याकरीता तक्रारदार यांच्याकडे ५०,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे व मागणी केलेली लाच रक्कम खाजगी इसम मुस्तफा यांच्याकडे देण्याचे निष्पन्न झाले. तसेच खाजगी इसम मुस्तफा शेख यांनी लोकसेवक चौगुले यांनी तक्रारदार यांच्याकडे मागणी केलेली लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करून तक्रारदार यांना लाच रक्कम घेऊन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता, पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी मुस्तफा दस्तगीर शेख, वय - ४१ वर्षे, (खाजगी इसम), रा. साई कॉलनी, गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर यांनी ५०,०००/- रूपये लाच स्विकारलेने, त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक ०१) सुभाष आनंदा चौगले, वय - ३९ वर्षे, पद - पोलीस हेड कॉन्स्टेबल,ब.नं.२०५२, नेमणुक - भुदरगड पोलीस ठाणे, रा. गुडाळ, ता. राधानगरी, जि.कोल्हापूर, ०२) मुस्तफा दस्तगीर शेख, वय - ४१ वर्षे, (खाजगी इसम), रा. साई कॉलनी, गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर यांचेविरूध्द भुदरगड पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार,वैष्णवी पाटील, पोलीस उपअधीक्षक स.पो.उप निरीक्षक प्रकाश भंडारे,पो.हे.कॉ.विकास माने, पो.हे.कॉ. संदिप काशीद, पो.ना.सचिन पाटील, पो. कॉ. उदय पाटील, चा.स.पो.फौ. गजानन कुराडे अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७. ९४०४३२१०६४ कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४.